## सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ३ यांची जबानी.

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की :-

माझे नांव : सचिन रामचंद्र म्हात्रे
वय सुमारे : ४३ वर्षे
व्यवसाय : नोकरी
राहणार : मु. बेलपाडा, पनवेल.

**शपथेवर सरतपास विशेष सरकारी अभियोक्ता श्रीमती थळकर यांचे मार्फत.**

1. मला आणि शेखर ठाकूरला न्हावाशेवा पोलीस ठाण्याच्या अधिकारी गावडे मॅडमने आम्हाला बोलाविले होते. मी आणि शेखर पोलीस स्टेशनला गेलो तेथे फिर्यादीचे वडील विनोद म्हात्रे होते. पोलीस मला आणि शेखरला टाउनशीप गार्डन येथे घेउन गेले होते. ज्याठिकाणी बसले होते त्याठिकाणी आम्हाला घेउन गेले होते. त्यानंतर पोलीस आम्हाला विमला तलाव उरण येथे घेउन गेले होते. जेव्हा आम्ही गेलो होतो ती तारीख ०१/०९/२०१५ अशी होती व वेळ सकाळी ९:०० ते ११:३० पर्यंतची होती. नंतर पंचनामा करून पोलीसांनी आमच्या सह्या घेतल्या. मी ते कागद ओळखू शकतो ज्यावर सही केली होती. आता मला घटनास्थळ पंचनामा दि. ०१/०९/२०१५ रोजीचा दाखविला. त्यावर माझी व शेखर ठाकूर यांची सुध्दा सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. दि.०१/०९/२०१५ च्या **घटनास्थळ पंचनाम्याला नि.क्र.पी-२६/सा.क्र.३** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान अधिवक्ता श्री. प्रविण ठाकूर यांच्यामार्फत सुरू.**

2. मी फिर्यादी कुटुंबाला ओळखतो ते माझे नातेवाईक आहेत. मला विमला तलाव आणि जे.एन.पी.टी बद्दल माहित आहे. हे म्हणणे खरे आहे की याठिकाणी बरेचसे लोक ये-जा करतात. गाड्या सुध्दा येतात.

मला पंचनाम्यासाठी जायचे आहे हे दि.३१/०८/२०१५ ला समजले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांसोबत याठिकाणी गेलो नव्हतो आणि पोलीसांनी आमच्यासमक्ष पंचनामा तयार केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की सरकार पक्षाला मदत करण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-

पनवेल,
दिनांक :०८/०७/२०२६

(एम. बी. ओझा)
विशेष न्यायाधीश, पनवेल,
जिल्हा-रायगड.